नवी आशा नवी दिशा
# सार्वमत

अहिल्यानगर | बुधवार, १० सप्टेंबर २०२५ | पान १२

महाराष्ट्रातील स्टोन, टाईल्स, सॅनेटरी वेअर्स व बाथ फिटींगचा
50 हजार स्क्वे. फूटचा
सर्वात मोठा मॉल
ATUL INDUSTRIES
M-5, MIDC, Shrirampur
Mo. 9975664151
9284791998 / 9561616100

## २२ सप्टेंबरपासून बिस्किटे-टूथपेस्टसारखी उत्पादने स्वस्त दरात मिळणार

**नवी दिल्ली**–२२ सप्टेंबरपासून नवीन जीएसटी दर लागू होण्यापूर्वी, सरकारने कंपन्यांना त्यांच्या जुन्या न विकल्या गेलेल्या स्टॉकची कमाल किरकोळ किंमत बदलण्याची परवानगी दिली आहे. उत्पादक, पॅकर आणि आयातदार आता स्टॅम्पिंग, स्टिकर किंवा ऑनलाइन प्रिंटिंगद्वारे जुन्या स्टॉकवर नवीन किंमती टाकू शकतील. भारताच्या ग्राहक व्यवहार विभागाने मंगळवारी एक आदेश जारी केला की, ही परवानगी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत किंवा जुना साठा संपेपर्यंत लागू राहील.

## राहुरी बसस्थानकाचे काम संथगतीने

### माजी खासदार तनपुरे यांची तीव्र नाराजी

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)**– राहुरी शहरातील सुमारे ५ कोटी रुपये खर्चाच्या नवीन एस.टी. बसस्थानकाचे काम अद्याप केवळ ४०-४५ टक्क्यांपर्यंतच पूर्ण झाले असून, ठरवलेल्या मुदतीचा शेवट जवळ येऊन ठेपलेला असतानाही काम संथगतीने सुरू आहे. त्यामुळे माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी बसस्थानकाला भेट देऊन कामाची पाहणी केली आणि संबंधित ठेकेदार, एस.टी. विभागातील अधिकारी यांना फोनवरून कानउघाडणी केली.



तनपुरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, अशीच कामाची गती राहिली, तर हे बसस्थानक २०२७ मध्ये जाऊनच पूर्ण होईल. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे कामाला गती देण्याची मागणी केली. विशेष म्हणजे, बस स्थानकाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेला संपूर्ण निधी उपलब्ध झाला असूनही काम रखडल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली.

प्रसाद तनपुरे हे राहुरी बसस्थानकाच्या कामावर सुरुवातीपासूनच लक्ष देत आहे. जुन्या जीर्ण बस स्थानकाची जागा रिकामी करून नव्या स्थानकाच्या बांधकामासाठी मंजुरी मिळवण्यापासून ते आजवरच्या प्रगतीवर लक्ष ठेवून आहे. मात्र, अपेक्षेप्रमाणे काम पूर्ण होत नसल्याने त्यांनी आर्किटेक्ट देवगावकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनीदेखील कामाची गती अत्यंत मंद असल्याचे मान्य केले. एस. टी. च्या बांधकाम विभागाचे अभियंता वाघ यांच्याशी तनपुरे यांनी चर्चा केली असता, त्यांनी सांगितले की, कामाची मुदत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत आहे; मात्र ठेकेदार आणि अभियंता या ठिकाणी क्वचितच येतात. श्री. वाघ यांनीही कामाच्या संथगतीबाबत दुजोरा दिला.

तनपुरे यांनी जेव्हा ठेकेदाराकडे कामास उशीर होण्याचे कारण विचारले, तेव्हा फॅब्रिकेशनचे डिझाईन अद्याप मिळाले नसल्याचे कारण देण्यात आले. मात्र आर्किटेक्ट देवगावकर यांनी सर्व आवश्यक डिझाईन्स वेळेवर दिल्याचे स्पष्ट केल्यामुळे, या कामात समन्वयाचा अभाव स्पष्ट झाला. यावेळी तनपुरे यांनी श्रीरामपूर आगाराचे व्यवस्थापक बहेर, बांधकाम अभियंता, आणि राहुरी स्थानकप्रमुख गोविंद गुलदगड यांच्याशी देखील चर्चा करत कामाच्या अडथळ्यांवर नाराजी व्यक्त केली.

## ओबीसींनो उठा जागे व्हा, आरक्षण वाचविण्यासाठी लढायला तयार व्हा

### अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश प्रचारक प्रा. विरकर यांचे आवाहन

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– ओबीसींनो उठा, जागे व्हा, आम्हाला पुढच्या पिढीच्या संरक्षणासाठी, उन्नतीसाठी आमचे आरक्षण आम्हाला महत्वाचे आहे. त्यासाठी लढाव लागणार आहे. आपले आरक्षण अबाधीत ठेवायची जबाबदारी आपल्यावर आहे, हे लक्षात ठेवा, गरिबांना ईडब्ल्यूएसचे आरक्षण आहे, त्यामुळे आरक्षणासाठी सर्वांनी एकत्र येऊन लढायला तयार रहा, असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश प्रचारक प्रा. संतोष विरकर यांनी केले.



श्रीरामपूर शहरातील माळी बोर्डींग येथे नुकत्याच संपन्न झालेल्या आढावा बैठकीप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आरोग्यमित्र सुभाषराव गायकवाड होते. तर समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्रशांत शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष अंकुशराव ताजणे, सावता प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयराव कुदळे, संतोष डहाळे, देविदास देसाई, तेली समाजाचे प्रदेश उपाध्यक्ष एकनाथ नागले, नाभिक समाजाचे उपाध्यक्ष चंद्रशेखर वाघ, कुंभार समाज संघटनेचे बाळासाहेब दुधाळे, बाजार समितीचे संचालक राजु चक्रनारायण, सुरेंद्र गिरमे, तालुकाध्यक्ष चंद्रकांत झुरंगे, जिल्हा सरचिटणीस प्रकाश कुऱ्हे उपस्थित होते.

प्रा. विरकर पुढे म्हणाले, फारच अडचण होत असेल तर अगोदर जातनिहाय जणगणना करा. समता परिषद नसती तर मंडल आयोग लागू झाला नसता. ज्यावेळी मंडल आयोग लागू झाला, तेव्हा तुम्ही कुठे होता? कारमध्ये जाता अन् आरक्षण मागताय, तरीही आमचा विरोध नाही, येथे आरक्षण आहे, म्हणून श्रीरामपुरातील आमदार अन् शिर्डी मतदार संघातील खासदार आरक्षणातील आहे. नाहीतर या स्वत:ला गरीब म्हणवून घेणाऱ्यांनी यांना संधी दिली असती का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

समता परिषद फक्त माळ्यांची आहे, हे डोक्यातून काढून टाका. समता परिषद सर्व ओबीसी बांधवांसाठी आहे. जेथे ओबीसींवर अन्याय होतो, तेथे समता परिषद उभी असते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गाव तेथे समता परिषदेची शाखा सुरू करण्याचे आवाहन यावेळी जिल्हाध्यक्ष प्रशांत शिंदे यांनी केले. यावेळी तालुकाध्यक्ष चंद्रकांत झुरंगे, प्रा. सुभाष लिंगायत, डॉ.राजेंद्र लोंढे, संचित गिरमे, जयंत लोखंडे, राजेंद्र सातभाई, डॉ.रमेश गाडेकर, एकनाथ नागले, संतोष डहाळे, देविदास देसाई व राजू चक्रनारायण आदींनी मनोगत व्यक्त केली.

भारतीय नौदल सेवेत दाखल झालेला खोकर येथील ओंकार संजय जगताप यांचा मान्यवरांच्या हस्ते यावेळी सन्मान करण्यात आला. यावेळी बेलापूर खुर्द शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. रमेश गाडेकर व बेलापूर बुद्रूक च्या अध्यक्षपदी सोमनाथ शिरसाठ यांची नियुक्ती केल्याचे जाहीर करण्यात आले.

या आढावा बैठकीस शहराध्यक्ष विवेक गिरमे, तालुका सचिव शरद कळमकर, भाऊसाहेब पुजारी, द्वारकानाथ बडधे, जालिंदर कुऱ्हे, बाळासाहेब हरदास, गोपाल लिंगायत, सुरेश गिरमे, लक्ष्मण चव्हाण, महेश दारूंटे, भाऊसाहेब जाधव, सतीष शिरसाठ, अर्जून कुऱ्हे, साईनाथ बनकर, ऋषी झिने, भाऊसाहेब वाकडे, राजेंद्र विधाटे, सुनिल विधाटे, गोरक्षनाथ म्हैस, शिवाजी भगत, डॉ. अनिकेत चव्हाण, सुनिल जोर्वेकर, द्वारकानाथ भगत, मधूकर माळवे, अमोल साबने, नितीन बोरूडे, अमोल धाडगे, निलेश विधाटे, सुनिल विधाटे, शरदतात्या लोंढे, गोकूळ टाकसाळ, भाऊसाहेब डोखे, गणेश गडगे, भरत राऊत, अरूण बुऱ्हाडे, अशोक सोनावणे, सतोबा राऊत, दिपक अंत्रे, भाऊसाहेब डोखे, उत्तम बोल्हे, विलास नागले व राहुल होले आदींसह ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व प्रास्ताविक चंद्रकांत झुरंगे यांनी केले तर आभार प्रकाश कुऱ्हे यांनी मानले.

## राहुरी पोलिसांकडून अजामीनपात्र वॉरंटमधील सात आरोपींवर कारवाई

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)**– राहुरी पोलिसांकडून राबविण्यात आलेल्या मोहिमे अंतर्गत काल दि. ९ सप्टेंबर रोजी पो.नि. संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाकडून विविध गुन्हे अंतर्गत अजामिनपात्र वॉरंट मधील एकूण ७ आरोपींना ताब्यात घेऊन कारवाई केली.



या कारवाईत गफार गुलाब शेख, रा. मेहेत्रे मळा, राहुरी, राहुल गंगाधर कलापुरे, रा. देसवंडी, शारदा संदीप तनपुरे, रा. वाघाचा आखाडा, अक्षय सुरेश कुलथे, रा. इंगळे इस्टेट, राहुरी, जालिंदर आसाराम पाषाण, रा. उंबरे, अनिल उत्तम सरोदे, रा. कानडगाव, रुपेश गोरक्षनाथ लष्करे, रा. वांबोरी, या सात जणांचा समावेश आहे. आरोपींना अटक करून न्यायालयात हजर केले. तसेच जामीनपात्र वॉरंटची बजावणी केली.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उप विभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनात राहुरी चे पो.नि. संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक राजु जाधव, सहाय्यक फौजदार तुळशीदास गीते, हवालदार विजय नवले, संदीप ठाणगे, संभाजी बडे, बबन राठोड, सतिश आवारे, सुरज गायकवाड, राहुल यादव, हनुमंत आव्हाड, संजय राठोड, देविदास कोकाटे, प्रवीण बागुल, बाबासाहेब शेळके, पोलिस नाईक गणेश सानप, सचिन ठोंबरे, जयदीप बडे, अंकुश भोसले, सागर नवले आदी पोलीस पथकाने केली.

## शिर्डीत सुजय विखेंसह प्रतिष्ठितांचे फोटो असलेला बॅनर फाडला

### फिर्यादीच निघाला मुख्य आरोपी; चौघांना अटक

**शिर्डी (प्रतिनिधी)**– शहरातील लक्ष्मीनगर परिसरात गणेशोत्सवाच्या काळात माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील व त्या प्रभागात राहणाऱ्या माजी नगरसेवक तसेच इतर प्रतिष्ठित व्यक्तींचे फोटो असलेले स्वागताचा बॅनर काही अज्ञात व्यक्तींनी फाडला होता. तसेच तीन दुचाकींचे नुकसान केल्याची घटना सोमवारी मध्यरात्री घडली होती. त्या अनुषंगाने एकाने शिर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ या घटनेचा तपास लावण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजचा आधार घेऊन चार आरोपींना तात्काळ जेरबंद केले. मात्र बॅनर फाडणारे आणि दुचाकींचे नुकसान करणारे स्वतः फिर्याद देण्यासाठी आलेले व्यक्ती असल्याचे निष्पन्न झाले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी, की लक्ष्मीनगर परिसरात गणेशोत्सवाच्या काळात गणेश भक्तांच्या स्वागतासाठी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, माजी उपनगराध्यक्ष नीलेश कोते, मंगेश त्रिभुवन व प्रतीक शेळके यांचे फोटो असलेले बॅनर लावले होते. ते दोन बॅनर व त्या परिसरात उभ्या असणाऱ्या तीन दुचाकींची मोडतोड करून एका दुचाकीमधील बॅटरी चोरण्याची घटना सोमवारी मध्यरात्री घडली होती. सदर घटना घडल्याची फिर्याद विशाल राजेश अहिरे याने शिर्डी पोलिसांत दिल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.



पोलिसांच्या तपासात या गुन्ह्यातील चार आरोपींपैकी फिर्याद देणारा विशाल अहिरे यानेच त्याच्या साथीदारासह हे कृत्य केल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे फिर्यादीच आरोपी निघाल्याची जोरदार चर्चा शहरात सुरू झाली. या चार आरोपींपैकी एक आरोपी अल्पवयीन आहे तर मुख्य आरोपी विशाल अहिरे, दिनेश दवेश गोफणे व राकेश सोमनाथ शिलावट (सर्व रा. लक्ष्मीनगर, शिर्डी) यांचा समावेश आहे. सदरचे कृत्य हे त्यांनी त्यांच्या आपापसातील झालेल्या भांडणातून केले असल्याची माहिती पोलिसांना दिली आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे, पोलीस उपनिरीक्षक सागर काळे व पोहेकॉ. संदीप उदावंत, बाळासाहेब गोराणे, केवल राजपूत, शेकडे यांनी या गुन्हाचा उलगडा केला.

## राहुरी विद्यापीठ प्रवेशद्वाराजवळ ट्रकच्या टायरला आग

### सुरक्षा रक्षकांच्या सतर्कतेमुळे पुढील अनर्थ टळला

**राहुरी (प्रतिनिधी)**– नगर मनमाड महामार्गावरील राहुरी कृषी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ पंजाबहून बंगळुरूकडे बटाटे घेऊन जाणाऱ्या एका ट्रकच्या मागील टायरला अचानक आग लागली. वेळीच सदर घटना विद्यापीठाच्या सुरक्षा रक्षकांच्या लक्षात आल्याने आणि त्यांनी तातडीने केलेल्या कार्यवाही केल्याने मोठी हानी टळली.ही घटना काल सकाळच्या सुमारास घडली.

राहुरी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ नगर-मनमाड महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. याच वेळी सुरक्षा रक्षक अनिल नजन हे आपले कामावर असताना, त्यांना ट्रकच्या (आरजे १४ जीजे ५०२३) मागील टायरमधून धूर येत असल्याचे दिसले. ट्रक पेटून मोठे नुकसान होऊ शकते, तसेच रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ शकते, हे लक्षात घेऊन त्यांनी तात्काळ सुरक्षा अधिकारी गोरक्षनाथ शेटे यांना फोन करून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच, सुरक्षा अधिकारी शेटे, सुरक्षा पर्यवेक्षक राहुल पवार, दत्ता आडसुरे, तुषार गिरगुणे, रवी येणारे, कल्याण मेटे, गोरक्षनाथ भालेराव, तसेच सुरक्षा रक्षक अभिजीत शिंदे, सचिन गवते, अनिल नजन आणि अक्षय येणारे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. विद्यापीठाच्या प्रवेशद्वाराजवळील अग्निशमन यंत्रणा घेऊन त्यांनी तात्काळ आग विझवली. या वेळी मदतकार्य करणाऱ्या सर्व सुरक्षा कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी केलेल्या या धाडसी व सतर्क कामगिरीमुळे मोठा अनर्थ टळला.

## पुणतांबा येथे बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद

**पुणतांबा (वार्ताहर)** – राहाता तालुक्यातील पुणतांबा परिसरात काही दिवसापांसून बिबट्याचा धुमाकूळ सुरू असल्याने नागरिकांत घबराटीचे वातावरण पसरल्याने या परिसरात वन विभागाकडे पिंजरा लावला होता. या पिंजऱ्यात बिबट्या अलगद जेरबंद झाला आहे.



वन विभागाने नागरिकांना तुम्ही साधन आणा आणि पिंजरा घेऊन जा असे सांगितल्याने शेतकऱ्यांनी वर्गणी गोळा करून राहाता येथून पिंजरा आणून पुणतांबा-रामपूरवाडी रस्त्याच्या कडेला असलेल्या वैशाली अशोक थोरात यांच्या वस्तीजवळ पिंजरा लावला. काल मध्यरात्री या पिंजऱ्यात बिबट्या अडकल्याने सकाळी बिबट्याला पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती. वनरक्षक सविता थोरात यांनी नागरिकांच्या मदतीने हा पिंजरा बिबट्यासह गाडीत टाकून तीस किलोमीटर अंतरावरील दुसऱ्या पिंजऱ्यात हलविण्यासाठी घेऊन गेल्या. यावेळी नागरिकांनी परिसरात बिबट्याची मादी, पिल्ले असल्याने पुन्हा एकदा या परिसरात पिंजरा लावून ठेवावा अशी मागणी केली. पिंजरा गाडीत टाकण्यासाठी भास्कर मोटकर, अशोक सरोदे, कैलास कोकाटे, आसाराम वडणे, अमोल धनवटे, यश जाधव, सतीश ठुबे, बाळासाहेब वहाडणे, बलराज धनवटे, नितीन घाडगे, दादा वायकर, आग्रे आदिंसह शेतकऱ्यांनी मदत केली.

## चिमुरडीवर अत्याचार; आरोपीला मरेपर्यंत जन्मठेप

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील दोन वर्षीय अल्पवयीन बालिकेवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपी भास्कर धाकू मोरे यास विशेष न्यायाधीश एस. एन. साळवे यांनी दोषी ठरवत मरेपर्यंत जन्मठेप व दहा हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.

ही धक्कादायक घटना उघडकीस आली, जेव्हा पीडितेला लघवी करताना त्रास होऊ लागला. तपासणीदरम्यान परिचारिकेला बालिकेवर अत्याचार झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर चौकशी केली असता पिडीतेने आरोपीने केलेल्या कृत्याची माहिती दिली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलिस ठाण्यात भादंवि कलम ३७६ (अ)(ब) सह पोक्सो कायद्याच्या कलम ४, ६, ८, १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक सुरेखा देवरे यांनी तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान एकूण सात साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यात पीडितेची आई, शेजारी राहणारी परिचारिका व ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांच्या साक्षी महत्त्वाच्या ठरल्या. सरकारी पक्षाने मांडलेला दावा न्यायालयाने ग्राह्य धरत आरोपीचा बचाव फेटाळला. सरकारी पक्षातर्फे विशेष तथा अतिरिक्त सरकारी अभियोक्ता पी. पी. गटणे व एम. आर. नवले यांनी काम पाहिले. याकामी पोलीस उपनिरीक्षक व्ही. आर. घाणे व हवालदार ठोंबरे यांनी सहाय्य केले.

## श्रीरामपुरात कर्णकर्कश डिजे वाजवणाऱ्यांवर कारवाई

### तीन गणेशोत्सव मंडळांच्या अध्यक्षांसह डीजे मालकांवरही गुन्हा दाखल

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– शहरात कर्णकर्कश आवाजामध्ये डिजे वाजवणाऱ्या सहा जणांविरुध्द सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वे ध्वनी प्रदुषण अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये तीन गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षांसह डीजे मालकांचा समावेश आहे.

शहरात वेळोवेळी साजऱ्या होणाऱ्या सर्वधर्मियांच्या सण उत्सव तसेच लग्न व इतर समारंभाप्रसंगी कर्णकर्कश आवाजात वाद्य वाजविले जाते, याबाबत अनेकांनी पोलीस ठाण्यामध्ये तक्रारी केल्या होत्या. त्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने वाद्यांच्या आवाजाबाबत किमान डेसीबल मर्यादा ठरऊन दिलेली आहे. त्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश केलेले आहे. चालु वर्षी श्रीगणेश विसर्जनापुर्वी ध्वनीप्रदुषण न करण्याबाबत शहरातील डिजे चालक-मालक तसेच गणेश मंडळांना आवश्यक त्या सूचना करण्यात आल्या होत्या. तसेच सार्वजनिक गणेश मंडळांना बीएनएसएस १६८ प्रमाणे नोटीस देण्यात आली होती.

दि. ०६ सप्टेबर रोजी गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान मोठ्या आवाजात डिजे वाजवून ध्वनीप्रदुषण करणाऱ्या डिजे वाहनांची पोलीस स्टेशनमार्फत तपासणी करण्यात आली. न्यायालयाचे आदेश व पोलिसांनी दिलेल्या सुचनांचे उल्लंघन करुन कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविणाऱ्या शंभु राजे मित्र मंडळाचे अध्यक्ष उमेश छल्लारे व डिजे साऊंड सिस्टीम चालक अश्पाक मोईनोद्दीन तांबोळी, अष्टविनायक मित्र मंडळाचे अध्यक्ष जयेश सुरेश झरेकर व गणेश ०९ या नांवाचे डिजे साऊंड सिस्टीम मालक-चालक गणेश गिते, महाकाल मित्र मंडळाचे अध्यक्ष सनी गौतम व सदगुरु डिजे साऊंड सिस्टीम मालका-चालक निखील विलास बनसोडे यांच्याविरुध्द शहर पोलीस स्टेशन येथे ध्वनी प्रदुषण अधिनियम तसेच इतर कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून डिजे जप्ती व पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधिक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, सहाय्यक फौजदार श्री. सुर्यवंशी, पोलीस हेड कॉन्स्टेबल दिपक कदम, प्रसाद साळवे, दादासाहेब लोढे, आंबादास आंधळे, आजिनाथ आंधळे, होमगार्ड श्री. देवकुळे, श्री. कलंके यांनी केली आहे.

नवी आशा नवी दिशा सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक- ✻ अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहिल्यानगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)